# पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे

४ ब, बी.जे.रोड, पुणे - ४११००१ दुरध्वनी क्र. २६१३३८३३, २६१३९३००

PDCC BANK

## जाहिरात

# लेखनिक पदाची ऑनलाईन सरळसेवा भरती

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे यांना लेखनिक हुद्द्याची ४३४ रिक्त पदे भरण्याकरीता निवड सूची तयार करणेसाठी सरळसेवा भरतीद्वारे पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १. | बँकेच्या संकेतस्थळावर परीक्षा शुल्कासह ऑनलाईन अर्ज भरणे | दि. ०१/१२/२०२५ ते दि. २०/१२/२०२५ रोजी रात्री २३.५९ वाजेपर्यंत. |
| २. | ऑनलाईन परीक्षा दिनांक | बँकेच्या संकेतस्थळावर अलाहिदा प्रसिध्द करण्यात येईल. |
| ३. | ऑनलाईन परीक्षा प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याचा दिनांक | बँकेच्या संकेतस्थळावर अलाहिदा प्रसिध्द करण्यात येईल. |
| ४. | कागदपत्रे पडताळणी व मुलाखत दिनांक | ऑनलाईन परीक्षा निकालानंतर बँकेच्या संकेतस्थळावर अलाहिदा प्रसिध्द करण्यात येईल. (बँकेचे संकेतस्थळ : https://pdcc.bank.in/careers/) |

## -: सूचना :-

१) पुणे जिल्ह्यातील मूळ रहिवासी असणाऱ्या उमेदवारांकरीता ७०% पदे राखीव आहेत व उर्वरीत ३०% पदे जिल्ह्याबाहेरील उमेदवारांकरीता खुली आहेत.

२) पुणे जिल्हयाबाहेरील पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास जिल्हयातील पात्र उमेदवारांमधून सदर पदे भरती करण्यात येतील.

३) उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज दाखल करताना मूळ रहिवासी प्रमाणपत्र (अधिवास प्रमाणपत्र - Domicile Certificate) अपलोड करणे बंधनकारक आहे.

४) उमेदवारांनी अपलोड केलेल्या अधिवास प्रमाणपत्राची छाननी कागदपत्रे पडताळणीच्या वेळी करण्यात येईल.

५) ऑनलाईन परीक्षा शुल्क संकेतस्थळावर अद्ययावत (Upload) केल्याशिवाय रजिस्ट्रेशन/नोंदणी प्रक्रिया पुर्ण होणार नाही.

६) उमेदवारांना ऑनलाईन परीक्षा शुल्काची रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरणा करता येईल.

७) ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराने स्वतःचा ईमेल आयडी, मोबाईल क्रमांक व आधार क्रमांक अचुक भरणे आवश्यक आहे अन्यथा अर्ज माहिती अभावी अपात्र होईल.

८) उमेदवारांनी अर्ज भरताना सदर पदासाठी आवश्यक पात्रता धारक असल्याची खात्री करुनच अर्ज भरावा.

९) भरती प्रक्रियेबाबतची सविस्तर अद्ययावत माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. सदर माहितीचे वेळोवेळी अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

१०) बँकेने सदर जाहिरातीमध्ये नमूद केलेली पदसंख्या, पात्रता निकष व निवड प्रक्रिया कार्यपध्दती इत्यादीमध्ये बदल करण्याचा अधिकार बँकेचा असून सदर बदल उमेदवारांवर बंधनकारक राहील.

(स्वाक्षरी)

दिनांक : ०४/११/२०२५

मुख्य कार्यकारी अधिकारी